शासकीय कला महाविद्यालय- वाटचाल 'नवीन पाऊलवाट'

प्रा. गो. कृ. देशपांडे

'रंगरेखा' वार्षिक ८८ हा शासकीय कलामहाविद्यालयाचा पहिलाच अंक! त्यानिमित्ताने महाविद्यालयाच्या स्थापनेपासून आजपर्यंतच्या कार्याचा आढावा घेणे औचित्याचे ठरेल. या भूमिकेतून या महाविद्यालयाचे प्रथम माजी अधिष्ठाता प्रा. गोविंद कृ. देशपांडे व विद्यमान अधिष्ठाता प्रा. म.भा. इंगळे यांनी आपले विचार मांडले आहेत. ते वाचकांना रसपूर्ण वाटतील. 'नवीन पाऊलवाट' निर्मिली आहे. प्रा. गो. कृ. देशपांडे यांनी.

या संस्थेच्या प्रेमातून उद्भवलेल्या भावनोत्कट शब्दात वाचा_ त्यांनी निर्मिलेली 'नवीन पाऊलवाट'.....

मराठवाडा विभागाच्या परिसरात भारतीय संस्कृतीच्या संपन्नतेच्या खुणा जागोजागी आढळतात. आंतरराष्ट्रीय कीर्तिची वेरूळची लेणी, अजिंठा गुंफातील जगप्रसिद्ध भारतीय संस्कृतीची ओळख करून देणारी भित्तीचित्रे ही ह्या विभागाचीच नव्हे तर सबंध भारताची भूषणे आहेत. भारतीय पारंपारिक कलेची इतकी अभिरुचीपूर्ण, सौंदर्यदृष्ट्या अप्रतिम अशी उदाहरणे ह्या विभागात असतानासुद्धा १९७१ सालापर्यंत दृक कलांचे शास्त्रोक्त पद्धतीने उच्च कला शिक्षण देणारी सर्व सोयींनी परिपूर्ण अशी एकही शासकीय संस्था ह्या विभागात नव्हती. सर्व विभागीय स्तरावर निदान एकतरी शासकीय कला संस्था स्थापण्याच्या दृष्टीने शासनाने १९७१ च्या जूनमध्ये औरंगाबाद येथे अशी पहिली संस्था सुरू केली. ती संस्था म्हणजे शासकीय कला महाविद्यालय (गव्ह. स्कूल ऑफ आर्ट) औरंगाबाद.

आता ही संस्था षोडश वर्षीय झाली असून, यौवनावस्थेस पोहोचली असतानाच संस्थेचे विद्यार्थी मंडळ "रंगरेखा" संस्थेच्या वार्षिक नियतकालिकाचा पहिला अंक प्रकाशित करीत आहे. ह्या वार्षिक विशेषांकाचे संपादक प्रा.सुधारक लवाटे असावेत हा एक विशेष योगायोगच म्हणावा लागेल. कारण १९७१ साली ह्या संस्थेची जेव्हा स्थापना झाली, तेव्हा जे पहिले तीन शिक्षक नियुक्त करण्यात आले होते त्यापैकी ते एक होत. (आणि या संस्थेचा तेव्हाचा पहिला संस्था प्रमुख. मी, अधिष्ठाता पदावर निवृत्त होवून आता आपले उर्वरित आयुष्य आपल्या विविध कला-छंदात सुखा समाधानाने पुण्यात घालवीत आहे.)

अशा व्यक्तीला त्याच्या प्रेरणेतूनं काहीतरी नवीन घडत असताना, त्याच्या उत्साहावर पाणी न ओतता तो द्विगुणित करावा, ह्या एकाच विचाराने गत काळातील स्मृतींना उजाळा देण्याचा हा प्रयत्न. जुन्या आठवणीतून प्रेरणा घेऊन ह्या पिढीतील नवोदित शिक्षकांनी, तसेच विद्यार्थ्यांनी नवनवीन उपक्रम सुरू करून संस्थेची प्रगतीपथावरील ह्या पुढली वाटचाल निष्ठेने चालू ठेवावी हा एक विचारही मनात डोकावला म्हणूनच हा प्रयास.

संस्थेच्या पहिल्या पाच वर्षाच्या निर्मिती काळाचा आढावा घ्यावयाचा म्हटले तर एक ग्रंथ लिहिणे सोपे जाईल पण जागेअभावी थोडक्यात लिहावयाचे म्हणजे दुधाची तहान ताकावर निभावण्यासारखेच आहे. काही गोष्टीचा इच्छा असूनही उल्लेख करता येणार. खरी परिस्थिती कळली तरच तत्कालीन प्रगतीच्या वाटचालीची अंशतः तरी जाणीव होईल अन्यथा नाही. हे स्पष्ट करून ह्या पुढील शब्दांकन, प्रथम संस्थेच्या घडण काळातील अडीअडचणी, त्यावर केलेली मात, तत्कालीन कला शिक्षण क्षेत्रातील वातावरण व परिस्थिती या संदर्भात करून, नंतर संस्थेला लोकाभिमुख करण्यासाठी केलेले प्रयत्न व उपक्रम अर्थात संस्थेची सर्वांगीण वाढ, काही "खट्टा-मिठा" सदरात मोडतील असे अनुभव अशा स्वरुपात करावे असे वाटते. ह्या दृष्टिकोनातूनच पाहणे उचित ठरेल.

मराठवाडा विभागाची एक नितांत गरज म्हणून शासनाने १९७१ साली औरंगाबाद येथे शास्त्रोक्त पद्धतीने उच्च कला शिक्षण देण्याच्या हेतूने एक सर्व दृष्ट्या आदर्श व परिपूर्ण असे कला महाविद्यालय सुरू करण्याचा निर्णय घेतला. त्यावेळच्या परिस्थितीनुसार महाराष्ट्रातील वेगवेगळ्या विभागातील छोटी मोठी जवळ जवळ २५ खाजगी कला महाविद्यालये वगळता मुंबई येथील दोन व नागपूर येथील एक अशी तीनच शासकीय कला महाविद्यालये अस्तित्वात होती. त्या परिस्थितीचा आढावा घेऊन शासनाने त्या वेळच्या पंचवार्षिक योजनेत प्रत्येक विभागात विभागीय स्तरावर एक शासकीय कला महाविद्यालय उघडावे असे ठरवून त्यावर्षी पहिले कला महाविद्यालय, औरंगाबाद येथे सुरू करण्याचे ठरविले. पुढे क्रमाने विदर्भात अकोला किंवा अमरावती येथे तर पश्चिम विभागासाठी जळगाव, नाशिक अथवा कोल्हापूर येथे सुरू करण्याच्या विचारात शासन होते. कला महाविद्यालयाची निर्मिती ही कला संचालनालयाच्या अखत्यारीतील बाब असल्या कारणाने तिच्या नियोजनाची सर्व

जबाबदारी कला संचालनालयाकडेच होती. लागणाऱ्या खर्चासाठी अंदाजपत्रकात तरतूद करून घेणे संस्थेसाठी योग्य जागेची निवड करणे, कार्यालयासाठी लागणाऱ्या कर्मचाऱ्यांची तरतूद त्यांच्या नियुक्त्या, शिक्षक वर्गाच्या नियुक्त्या, नवीन पदांची निर्मिती, त्यासाठी योग्य व्यक्तींची निवड ह्या सर्व गोष्टी कला संचालनालयाद्वारेच करावयाच्या होत्या. ह्याबाबत कामाला सुरुवात देखील झाली होती. औरंगाबाद येथे जाऊन जागेची पाहणी करून "जनाना महाल' ह्या किलेअर्क विभागातील टेकडीवरील वास्तूची निवड करण्यात आली होती. संस्था प्रमुखपदी नियुक्ती तसेच इतर दोन शिक्षकांची नियुक्ती, कार्यालयातील ज्येष्ठ लिपिकाची नियुक्ती ह्याबाबत विचारविनिमय चालू होते. ग्रीष्मकालीन कला शिबिराच्या निमित्ताने त्यावेळी म्हणजे ७१ च्या सुमारास मला कळले की, औरंगाबाद येथे सुरू होत असलेल्या कला संस्थेच्या प्रमुखपदी कुठल्याही प्राध्यापकाची नियुक्ती न करता पुढल्याच वर्षी निवृत्त होणार असलेल्या तत्कालीन कला व हस्तकला निरीक्षकांची नियुक्ती होत आहे.

मला वरील घटना समजताच, मुंबईतील राजकारणाचा पूर्वीचा अनुभव माझ्या पदरी असल्यामुळे कुठेही वाच्यता न करता मी सचिव शिक्षण विभाग, "औरंगाबाद येथील संस्थाप्रमुख पदावर नियुक्ती करताना माझी अर्हता प्राप्तता, परदेशातील घेतलेल्या कला शिक्षणाचा अनुभव, प्राध्यापक पदावरील अनुभव, प्राध्यापकांच्या ज्येष्ठता यादीतील माझ्या क्रमांकाचा तसेच विभागीय बढती नियमात नमूद केलेल्या इतर बाबींचा विचार व्हावा, माझी औरंगाबादला जाण्याची तयारी आहे. माझ्यावर कुठल्याही प्रकारे अन्याय होणार नाही ह्याची दक्षता घ्यावी" असे एक निवेदन तयार करून सरळ कला संचालकांना भेटावयास त्यांच्या चेंबरमध्ये गेलो. "माझे हे निवेदन सचिवाकडे कृपया त्वरित अग्रेषित करावे" , अशी विनंती करून काहीही न बोलता तडक बाहेर पडलो/दोन दिवस असेच निघून गेले. १३ ता. ला कला संचालकांनी मला त्यांच्या चेंबरमध्ये बोलावले व "तुम्ही आहात त्याच पदावर तुमची औरंगाबाद येथील संस्था प्रमुख म्हणून नियुक्ती करण्यात येत असून, सध्याच्या प्राध्यापकपदाचा कार्यभार सांभाळून ही अतिरिक्त जबाबदारी तुम्हाला प्रभारी अधिकारी म्हणून सांभाळावयाची आहे" असे सांगितले. ते पुढे म्हणाले, "तुम्ही स्वतःहून ही जबाबदारी पत्करली आहे. मी तुम्हाला सुयश चिंतितो. तुम्हाला तक्रार करावयास आता जागा नाही. तुम्ही १५ मेला औरंगाबादला कामावर रुजू व्हा. प्राथमिक कामांची सुरुवात तेथील विभागीय शिक्षण उपसंचालकांनी केली असणार. त्यांच्याकडून सर्व कागदपत्रे तुमच्या ताब्यात घ्या व कामास सुरुवात करा. १५ जुलै रोजी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते संस्थेचे उद्घाटन ठरविले आहे. तेव्हा कामात गती आणावयास हवी हे लक्षात घ्या". त्या दिवशी १३ मे ही तारीख होती. मुंबईतील शिबिरातील कामातून मुक्तता ताबडतोब झाली. दि.१५ रोजी नागपूर येथे पोहोचल्याबरोबर प्राध्यापकपदाचे हस्तांतर करून मी नागपूर सोडले व दि.१६ रोजी औरंगाबादला ठरल्या कामावर रूजू झालो. त्याआधी १५-२० वर्षापूर्वी एकदाच अजिंठा वेरूळला जाताना औरंगाबादला आलो होतो. मी टिळक पथावरील अशोक हॉटेलमध्ये उतरलो. पुढे जवळ जवळ ३ महिने माझा मुक्काम तिथेच होता/औरंगाबादला त्यावेळी एक दोन पूर्व परिचित व्यक्ती सोडल्या तर कुणीही ओळखीचे नसल्यामुळे एकटेपणा जाणवत होता. पण त्यामुळे सर्व वेळ मी संस्थेच्या कामात मग्न असावयाचो. शिक्षण उपसंचालकांना जावून भेटलो. "ज्या वास्तूत तुमची संस्था सुरू होणार आहे ती पाहून घ्या. त्याच वास्तूत चेलीपुरा हायस्कूलही आहे. त्याच्या मुख्याध्यापकांना भेटा. ते तुम्हाला तुमच्या संस्थेचा, त्या वास्तूतील भाग दाखवितील. तो पाहून तुम्हाला हवे असलेले बदल दुरुस्ती, रंगरंगोटी, विजेची कामे, इमारत व बांधकाम खात्यामार्फत तसेच इलेक्ट्रिकल सब डिव्हीजनच्या कार्यालयामार्फत करून घ्या. आणखी काही मदत लागली तर मला सांगा, मी आहेच", असे त्यांनी सांगितले.

हे शिक्षण उपसंचालक म्हणजे श्री.पं.तु.महाजन. सदा हसतमुख असे व्यक्तिमत्व. काम करण्याची एक वेगळीच तडफ त्यांच्यात होती. त्यांनी सांगितल्याप्रमाणे ११-३० ते १२ वाजण्याच्या सुमारास प्रथम ट्रेझरी ऑफिसात जावून चार्ज रिपोर्ट दाखल करून "जनाना महाल" गाठला. तेथे पोहोचोण्यापूर्वी "जनाना महाल" ह्या नावामुळे ती वास्तू पाहण्याची खूप उत्सुकता होती. एक प्रकारचे गूढ तसेच स्वप्नमय चित्र डोळ्यासमोर उभे होते. अशा वास्तूत आपण आपल्या कल्पनेप्रमाणे एक नवीन संस्था निर्माण करणार आहोत असे सुखद विचार डोक्यात चालू असतानाच तिथे पोहोचलो. अन् डोळ्यासमोर काजवे चमकणे म्हणजे काय ह्याचा चक्क प्रत्यय आला. एक इतिहासजमा, कळाहीन वास्तू पाहून "खंडहर बताते के इमारत बुलंद थी-" ह्या वस्तुस्थितीबरोबर "लेकिन इसकी मर्रम्मत करना अपने बसकी बात नही" असाच विचार मनात आला. मन एकदम खट्टू झाले. ज्या भागात कला संस्था उभारण्याची होती त्या भागात पूर्वी आर्टस् व सायन्स कॉलेजचा रसायन शास्त्र विभाग भरत असे. हा भाग सुरक्षेच्या दृष्टीने धोकादायकच होता. जेव्हा मी तिथे गेलो तेव्हा समजले की, सध्या ज्या खोलीत अधिष्ठातांचे ऑफिस आहे त्या खोलीसह समोरचा वऱ्हांड्याचा भाग, मागील बाजूचा एक लंबोळका हॉल व दोन पॅसेजवजा अगदी लहान खोल्या संस्थेच्या वाट्याला आल्या होत्या. ज्या खोलीत अधिष्ठातांचे ऑफिस होते, त्याला वऱ्हांड्याचे बाजूला एकच दरवाजा होता. भर दुपारी तिथे अंधार होता इतकेच नव्हे तर एक प्रकारचा कुबट रासायनिक वास सर्वत्र दरवळत होता. त्या खोलीतं जाणे तर सोडाच पण डोकावण्याची पण इच्छा होत नव्हती. पण इथेच काम करावे लागणार म्हणून ती खोली पाहणे भाग होते. आत पाहतो तर एक वटवाघूळ घिरट्या घालीत होते. हवा दूषित वाटत होती. प्रकाश एक वेळ आणता येईल पण खेळती हवा कशी आणणार हा एक प्रश्नच होता. त्या खोलीला मागील खोल्यात प्रवेश करण्यासाठी आणखी एका दाराची आवश्यकता होती पण त्या भिंतीची जाडीच अडीच- तीन फुटांची होती. हवा खेळती राहण्यासाठी एखादी तरी खिडकी आवश्यक होती, पण ती करवून घेणे शक्य नव्हते. मागील हॉलमध्ये गेलो तर चालताना जमीन हादरत होती. कारण खाली घोड्यांच्या तबेल्यासारखी मोकळी जागा होती व ज्या लाकडी सळ्यांवर ती जमीन आधारित होती, त्या सळ्याच बाहेरच्या बाहेर कुणीतरी लंपास केल्या होत्या. त्यावेळी असेही निदर्शनास आले की, ती मोकळी जागा आवाराच्या अभावी, सार्वजनिक शौच्यालय, मूत्रीघर म्हणूनही आजूबाजूच्या लोकांकडून वापरण्यात येत होती. सुरक्षिततेच्या दृष्टीने प्रथम वरील हॉलच्या मोकळ्या जागेच्या भिंतीत ज्या कमानी होत्या त्या कमानी बांधकाम करून बंद करणे क्रमप्राप्त होते. अन्यथा पुन्हा सळ्या चोरीस जाण्याची शक्यता होती. भिंतीचे आवार घालणे आवश्यक होते. त्यावेळी प्रकर्षाने जाणवले की, महिला विद्यार्थिनींनी प्रवेश घेतला तर त्यांच्यासाठी स्वच्छता गृह नाही (आणि पुढे दोन वर्ष ह्या संस्थेतील विद्यार्थिनींना शेजारच्या कॉलेजमधील स्वच्छता गृहाचाच उपयोग करावा लागला.) चौकशी करता तिथे बांधकाम खात्याचे काही कामगार काम करत असल्याचे दिसले. त्यांना कामाची देखभाल करणारे कोण आहेत? केव्हा येतात? वगैरे विचारता एक सब-ओव्हरसिअर सकाळी ९-३० ला ह्या कामगारांना दिवसभराचे काम सांगून संध्याकाळी काम कुठवर झाले पाहावयास येतात असे समजले. साधारण अडीच तीन वाजेपर्यंत सबंध वास्तू पाहण्यात घालविली. चेलीपुरा हायस्कूलच्या ताब्यातील भागही पाहिला, कारण पुढल्या वर्षी त्यातील आणखी काही भाग व नंतरच्या वर्षी ती पूर्ण इमारत ह्या संस्थेला मिळणार होती. इमारतीची ही अवकळा पाहून मन विषण्ण झाले होते. अशाच मनःस्थितीत हॉटेलमध्ये परत आलो. सकाळच्या ब्रेकफास्टनंतर पोटात काहीच गेलेले नव्हते. उपशिक्षण संचालकांच्या कार्यालयातून आमच्या संस्थेच्या संदर्भातील कागदपत्रे बरोबर आणली होती, ती चाळत बसलो.

त्यात फक्त जुजबी फेरबदल, रंगरंगोटी व इलेक्ट्रिकल फिटींग्ज ह्या व्यक्तिरिक्त कशाचाही उल्लेख नव्हता व मंजूर झालेल्या रकमेत इतर काहीही करता येणे शक्य नव्हते. स्वेच्छेने व झगडून आपण संस्था प्रमुख पद मिळविले तर खरे, पण ही सर्व परिस्थिती पाहून आपण भलतीच जोखीम आपल्यावर ओढवून घेतली असे वाटू लागले. माघार घेऊन परत नागपूरला जाताही आले असते, पण मग तोंड वर करावयाला पुढे कधी जागाच उरली नसती. शिवाय आपण परत गेलो तर दुसरा कुणीतरी येऊन इथेच काम करणार ना? असा विचार करून निश्चय केला की इथेच आपण काही तरी सुंदर करून दाखवूनच आपले कर्तृत्व सिद्ध करावयाचे. शेवटी चिखलातच कमळ उमलतेना? त्याच्या उमलण्याला खरी आवश्यकता असते सूर्यप्रकाशाची. आपले प्रयत्न व वरीष्ठांकडून सहकार्य मिळाले तर ते सहज शक्य आहे. म्हणून ठरवून टाकले की, कला संचालकांशी संपर्क साधून त्यांना वस्तुस्थितीची जाणीव करून द्यावयाची. मुख्यमंत्री उद्‌घाटनास येणार आहेत तेव्हा ह्या ह्या सोयी, दुरुस्त्या अत्यावश्यक आहेत. तरी त्वरित कार्यवाही करून खर्चासाठी आणखी रक्कम मंजूर करावी व येथील कामे झटपट होण्यासाठी ज्येष्ठ लिपिकाला ताबडतोब पाठवावे असे सांगावे. येथील बांधकाम खात्याच्या व वीज खात्याच्या सब डिव्हीजलन ऑफिसच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना भेटून त्यांचेही सहकार्य घ्यावयाचे ठरविले. पण सारखे वाटावयाचे की जर हे सहकार्य नच मिळाले तर? उदासीनता वाढत होती. परक्या ठिकाणी एकटेपण प्रकर्षाने जाणवत होते. संध्याकाळचे साडेपाच वाजले. भुकेने जोर केला. जेवण झाल्यावर विरंगुळा म्हणून व वेळ जावा म्हणून चक्कर मारावयास बाहेर पडलो. समोरच सिनेमागृह होते. पण सिनेमाला जावेसे वाटेना. साडेसात वाजण्याच्या सुमारास हॉटेलात परत आलो. काउंटरवर एक व्यक्ती माझीच चौकशी करीत होती. माझा तिचा परिचय नव्हता.

काऊंटरवर खोलीच्या कुलपाची किल्ली मागताच त्या व्यक्तिने 'इथे गव्ह. स्कूल ऑफ आर्ट होणार आहे, त्याचे संस्था प्रमुख आपणच ना?' असे विचारून मी अमुक, मी एका साप्ताहिकाचा संपादक आहे. तसाच रोटेरिअन देखील आहे, अशी आपली ओळख करून दिली. 'या नव्याने सुरू होणाऱ्या संस्थेविषयी आपल्याशी मला बोलावयाचे आहे. आपले विचार जाणून घ्यावयाचे आहेत. तेव्हा आपणाला मी केव्हा भेटू शकतो?' असे विचारले. आपला या व्यक्तिशी काही एक परिचय नसताना अशा विनंतीचा स्वीकार करावा की नाही हा विचार मनात क्षणभरच डोकावून गेला, पण लगेच मी त्यांना म्हटले की 'आपण आता भेटलो आहोतच. तुम्हाला वेळ असेल तर चला आपण आताच बसूया.' खोलीत शिरल्यावर त्यांनी सुरुवात करण्यापूर्वी मीच म्हटले, "साहेब आपण आपली ओळख करून देताना आपण पत्रकार, रोटेरीअन, कलाक्षेत्रातील व्यक्तिंचे स्नेही असल्याची जाणीव करून दिलीत हे फार छान केलेत, पण मी एवढेच सुचवू इच्छितो की, मी एक जबाबदार शासकीय अधिकारी आहे. त्यामुळे माझ्यावर काही निर्बंध असणार याची आपण योग्य ती दखल घ्याल असे मला वाटते." माझे म्हणणे त्यांना एकदम पटले. याचा मला ताबडतोब प्रत्ययही आला. ते मला म्हणाले, "मला तुमचा हा स्पष्टपणा एकदम आवडला. पण या मुलाखतीचे मला कुठल्याही प्रकारे भांडवल करून तुम्हाला अडचणीत टाकायचे नाही. सामान्य माणसाचे प्रश्न व विचार एक सामान्य नागरिक म्हणून आपणासमोर मांडणार आहे. इथे मराठवाड्यात औरंगाबादला, तसेच नांदेड, लातूरला जर आधीच कला महाविद्यालये आहेत तर पुन्हा औरंगाबादला आणखी एका कला महाविद्यालयाची शासनाला आवश्यकता का वाटावी? त्यातीलच एखाद्या संस्थेचे शासकीय संस्थेत रूपांतर करता आले नसते का? किंवा त्यांची अनुदाने वाढवून त्याच संस्थाचा विकास करता आला नसता का?" मला प्रश्न पडला, या प्रश्नाचे उत्तर काय द्यावे? आपले उत्तर म्हणजे शासनाच्या प्रतिनिधीचे उत्तर म्हणजेच शासनाचे उत्तर असे गृहीत धरले तर? पण क्षणभर थांबून मी जे उत्तर तेव्हा दिले त्यावर नंतर माझाही विश्वास बसेना. मी म्हटले, "हे पहा निर्णय शासनाने का व कधी घेतलाय हे मला माहीत असण्याची गरजच नाही. पण शासनाने घेतलेल्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यासाठी दिनांक १३ रोजी शासनाने माझी नियुक्ती केली व आज दिनांक १६ रोजी माझ्या वैयक्तिक व कौटुंबिक अडचणींचा बाऊ न करता पुढील कामासाठी मी इथे दाखल झालोय. ही जबाबदारी मी माझा हक्क म्हणून स्वेच्छेने स्वीकारली आहे. तेव्हा हे काम मी निष्ठेने करणार असून अजिंठा वेरूळ इतकीच ही संस्था औरंगाबादला भूषणावह ठरावी यासाठी माझे अथक प्रयत्न राहतील. संस्था लोकाभिमुख करून संस्थेची व सामान्य जनतेची बांधिलकी व जवळीक घडवून नागरिकांतील कला रसिकतेला वाढविण्याचे कार्य या संस्थेने करावे. निव्वळ विद्यार्थ्यांना ठराविक अभ्यासक्रमाप्रमाणे शिक्षण देण्यापुरतेच मर्यादित कार्य या संस्थेचे नसावे असे मला वाटते. व तशी वाटचाल संस्था करील याची खात्री बाळगा. आपण ज्या कला संस्थांचा नामनिर्देश केलाय त्यातील एकही संस्था महाराष्ट्रात अद्यापही लोकाभिमुख झालेली तर नाहीच, पण कला संस्थेस हव्या असलेल्या आवश्यक बाबींची परिपूर्तताही करू शकली नाही. आणि सर्वात मुख्य म्हणजे या नवीन संस्थेच्या निर्मितीच्या कारणास्तव शासनाने अस्तित्वात असलेली कुठलीही संस्था बंद केली नाही किंवा त्यांच्या अनुदानातही कपात केलेली नाही. वेरूळची लेणी व अजिंठा येथील गुंफामधील पारंपारिक चित्र कलेची व संस्कृतीची पार्श्वभूमी लक्षात घेऊन शासनाने हा निर्णय घेतला असण्याची शक्यता असू शकते, अन्यथा इतरत्र दुसऱ्या विभागातही अशी संस्था काढता आली असती. नाही का?" माझे उत्तर त्यांना पटले. ह्या माझ्या वक्तव्यानंतर कला संस्था व समाज यांच्यातील बांधिलकीची आवश्यकता, व्यबसायाधिष्ठित कला अभ्यासक्रम असे कित्येक विषय आमच्यात चर्चिले गेले. साडे नऊ केव्हा वाजले कळले देखील नाही. दोघांनाही कुठे अवघडल्यासारखे झाले नाही. निघता निघता ते म्हणाले, "आमच्या रोटरी क्लबात आपण "दैनंदिन जीवनात रंगाचे महत्त्व" या विषयावर प्रात्यक्षिकांसह भाषण देण्यास पुढील आठवड्यात या", पण संस्थेचे उद्‌घाटन होण्यापूर्वी कुठल्याही व्यासपीठावर यावयाचे नाही असे मी ठरविले असल्याचे त्यांना सांगितले व नम्र नकार दिला. १३ ऑगस्टला संस्थेचे उद्‌घाटन झाले, नंतर लगेच रोटरी क्लबात माझे भाषण झाले.

एकाच भेटीत गावातील प्रतिष्ठित व्यक्तींशी परिचय झाला. बऱ्याच जणांकडून बरेच सहकार्यही मिळाले. ह्याचे सर्वश्रेय मला अकस्मात भेटलेल्या त्या अपरिचित व्यक्तीस म्हणजे श्री.ज.प.मुळे ह्यांना जाते. श्री.मुळे भेटल्यामुळे मानसिक ताण एकदम नाहीसा झाला होता. रात्रभर छान झोप लागली. व दुसऱ्या दिवसापासून जोमाने कामास सुरुवात करता आली.

दुसरे दिवशी कला संचालकांशी संपर्क साधला. सर्व परिस्थितीची जाणीव करून दिली. मंजूर केलेल्या खर्चापेक्षा जास्त खर्च करावा लागेल. इमारतीची दुरुस्ती बरीच आहे. काही समस्या आपण इथे आल्याशिवाय सोडविता येणार नाहीत. निदान मी सुचवीत असलेल्या बदलांना तसेच काही नवीन बांधकामांना अति महत्त्वाचे व निकडीचे समजून प्राधान्य देवून संमती द्यावी म्हणून विनंती केली. तेव्हापासून मला त्यांच्याकडून पुढे प्रत्येक बाबतीत सहकार्य मिळत गेले. त्यांनी सर्वप्रथम कला संचालनालयातील एक ज्येष्ठ कर्मचारी श्री.तात्या महाजनींना औरंगाबाद येथे १५ दिवसांसाठी ताबडतोब पाठवून दिले. एक अत्यंत तडफदार व अनुभवी, तसेच सर्व प्रकारच्या जबाबदाऱ्या सांभाळणारी अशी ही व्यक्ती होती. कुठली कामे कुठल्या स्तरावर व कशी करून घ्यावयाचे हे तंत्र त्यांना चांगले अवगत होते. आम्ही दोघांनी सर्व

संबंधित अधिकाऱ्यांच्या भेटी घेतल्या, मुख्यमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन दिवस ठरला असल्यामुळे काम प्राधान्य देवून करावे. काम होण्यासारखे नसेल तर तसे प्रमाणपत्र द्यावे म्हणजे कोटेशन्स मागवून ते दुसऱ्या संस्थेमार्फत करवून घेता येईल, असे सांगून ती प्रमाणपत्रे मिळविली व पुढील कामास लागलो. सुपरिंटेंडींग इंजिनिअर्स इ. व. बां. खाते व विभागीय वीज मंडळ, शासकीय छापखान्याचे व्यवस्थापक, जेलचे तुरुंगाधिकारी ह्या सर्वांनी खूप सहकार्य दिले. त्यामुळे कामास गती प्राप्त झाली. मे महिना संपला, जून उजाडला. संस्थेच्या कार्यालयासाठी लिपीक म्हणून श्री.समुद्र औरंगाबादेत दाखल झाले व तात्या महाजनी मुंबईस परतले. श्री.समुद्रदेखील कामात अत्यंत तडफदार, स्वभावाने मनमिळावू, शांत विनोदबुद्धी सदा जागृत असलेली अशी व्यक्ती. संस्थेच्या घडण काळात व अल्पावधीत संस्थेने जी यशस्वी वाटचाल केली त्यात त्यांचा सिंहाचा वाटा आहे. श्री.समुद्र येण्यापूर्वी तात्या महाजनी आणि मी मिळून बरीच कामे केली होती. दोन चपराशी सुभाष बागडे व रामचंद्र ब्रव्हडवाल नियुक्त केलेच होते. ह्या वेळपर्यंत आम्ही उपशिक्षण संचालकांच्या कार्यालयातून जनाना महालमध्ये आमचे ऑफिस आणले होते. जूनच्या पहिल्या आठवड्याअखेर श्री.बोवलेकर व श्री.लवाटे, सहअधिव्याख्याता व अधिव्याख्याता म्हणून औरंगाबादेत दाखल झाले. श्री.महाजनींनी मुंबईला गेल्यावर इथल्या अडीअडचणींची यथार्थ जाणीव कला संचालकांना दिली त्यामुळे त्यांनी पुढे माझ्या बहुतेक प्रत्येक मागणीस मान्यता दिली. ह्या वेळपर्यंत इमारत व बांधकाम खात्याने, तसेच इलेक्ट्रिकल सब डिव्हीजनच्या कार्यालयांनी आपआपली कामे पूर्ण केली. सर्व खोल्यांना ऑफ व्हाईट डिस्टेंपर, खिडक्यादारांना लाईट ग्रे कलर, सर्व खोल्यात दिवे, पंखे अधिष्ठातांच्या कक्षाला एक नवीन दरवाजा (भिंत फोडून) एकदम सर्व कायापालट झाला. इमारत व बांधकाम खात्याने सुचविल्याप्रमाणे "इन अँटीसिपेशन ऑफ सँक्शन" ह्या वाक्याचा उपयोग केल्याने त्या शब्दात काय जादू व सामर्थ्य सामावलेले आहे ते समजले. शेजारच्या आर्ट सायन्स कॉलेजमधील तसेच चेलीपुरा हायस्कूलमधील मंडळी हा सर्व प्रकार पाहून थक्कच झाले. पुढील चार वर्षात करावयाच्या फेरबदलाबाबत, आवाराच्या भिंतीबाबत, स्वच्छतागृहाच्या बांधकामाबाबत अंदाज आराखडा तयार करण्यात आला. त्यातील काही कामे पहिल्याच वर्षात करवून घेण्यात आली. अगदी प्रांजळपणे सांगावयाचे म्हणजे ज्याला खरोखरीच अडचणी म्हणाव्या अशा अडचणी पहिल्या महिन्या दोन महिन्यात आल्या. कारण खर्चासाठी निधी त्या त्या विभागाकडे पोहोचेपर्यंत काम सुरू होणेच कठिण होते. उद्घाटनाचे वेळी जेव्हा कला संचालक औरंगाबादला आले, तेव्हा त्या वास्तूचा झालेला इतका कायापालट पाहून ते थक्कच झाले. कारण त्यांनी वास्तू कशी होती ते माझ्या इथे येण्याअगोदर एकदा पाहिली होती. नंतर मी जेव्हा जेव्हा कुठलीही मागणी करीत असे तेव्हा पहिल्या अडीच तीन महिन्यातील काम त्यांनी प्रत्यक्ष पाहिले असल्यामुळे मी मागावे व त्यांनी द्यावे असे घडत होते. बहुतांशी कामे प्राधान्य देवून होत होती, त्यामुळे मुंबई, नागपूरच्या संस्थांच्या मागण्या पूर्ण करण्याआधी प्रथम औरंगाबादच्या मागण्यांना प्राधान्य मिळत असे. प्रत्यक्ष काम पाहिल्यामुळे कुणाच्याही सांगण्यावरून त्यांनी कधीच माझ्या मागण्यांकडे दुर्लक्ष केले नाही. उलट "बघा ते देशपांडे कुठल्या परिस्थितीत कसे छान काम करताहेत" असेच म्हणत. श्री.लवाटे, श्री.समुद्र, श्री.बोवलेकर, जूनमध्ये येवून पोहोचलेच होते. संस्थेसाठी लागणारे फर्निचर, कला साहित्य, अवजारे व इतर आवश्यक बाबींची खरेदी, जुळवाजुळव, प्रवेश अर्जाचे वितरण, गुणवत्तेनुसार त्या त्या विद्यार्थ्यांना प्रवेश देणे, वर्ग सुरू होण्यापूर्वी वर्गाच्या कामाचे साप्ताहिक वेळापत्रक, शिकविण्यासाठी विषयांची आपसात वाटणी, अभ्यासक्रमाच्या अनुषंगाने पहिल्या सत्राचा पूर्ण शैक्षणिक कार्यक्रम आखणे, ही कामे आम्ही आपसात वाटून घेतली व कामाला सुरुवात झाली.

विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत एक खास बाबीची तरतूद पहिल्या दोन वर्षासाठी केलेली होती. ती म्हणजे जवळजवळ १०-१२ जागा मराठवाड्यातील जिल्हा परिषदांच्या प्राथमिक-माध्यमिक शाळांतील कला शिक्षकांच्या प्रती नियुक्ती तत्त्वावर भरावयाच्या असल्या कारणाने राखीव ठेवल्या होत्या. ते सर्व शिक्षक जि.प.च्या आदेशानुसार वेळेवर येवून दाखल झाले होते. इतर विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देवून आम्ही ताबडतोब कामास सुरुवात केली. जून महिना जवळ जवळ संपलाच होता. १३ जुलैला उद्घाटन व्हावयाचे होते. त्यावेळी प्रत्येक विषयाचे, प्रत्येक विद्यार्थ्याच्या वर्ग कामाचे १-२ नमुने मिळाले, तर उद्घाटनप्रसंगी त्यांचे प्रदर्शन मांडण्याचा निर्णय आम्ही घेतला. अर्थात कला संचालकांची अथवा इतर कुणाचीही तशी अपेक्षा नव्हती. आम्ही देखील त्याची कुणाजवळ वाच्यता केली नव्हती कारण जमले तर ह्या सदरातील हे काम होते. जून संपला तरी महाराष्ट्रातील काही भागात पावसाचे नाव नव्हते. मराठवाड्यात व विशेषतः औरंगाबादेत आकाशात रोज ढग येत व काही वेळाने वाऱ्याने वाहून जात. पाऊस नाही, हर्सूल तलाव कोरडा पडत होता. पाण्याचे हाल सुरू झाले. इतर ठिकाणीही पाऊस नसल्यामुळे पिण्याच्या पाण्याचे दुर्भिक्ष जाणवू लागले आणि एके दिवशी निरोप आला "१५ जुलैला उद्घाटन होवू शकणार नाही. मुख्यमंत्री पाण्याच्या टंचाईग्रस्त भागातील परिस्थिती पाहण्यासाठी त्या त्या भागात जाणार आहेत. उद्घाटन १३ ऑगस्टपर्यंत पुढे ढकलण्यात येत आहे." जुलै महिना संपला, ऑगस्टचा पहिला आठवडा आला आणि गेला पण रोज ढगाचे आकाशात जमणे व निघून जाणे हाच प्रकार चालू होता. आधीच आमच्या वैयक्तिक अडचणी कमी नव्हत्या. राहण्यासाठी सुयोग्य जागा मिळत नव्हत्या. कशाबशा ज्यांना मिळाल्या (म्हणजे समुद्र बोवलेकर व लवाटे ह्यांनी मिळून एक जागा एकत्रित घेतली होती- खडकेश्वरला) तिथे पाण्याचे हाल, रॉकेलची टंचाई म्हणजे त्यासाठी रांगा आल्याच. निदान सकाळचे चहापाणी घरी करावयाचे म्हटले तरी त्या परिस्थितीत ते शक्य नव्हते. त्यांचे हाल बघवत नव्हते. अशोक हॉटेलात राहात असल्यामुळे मला निदान आंघोळीला पाणी व उठल्याबरोबर चहा तरी मिळत असे म्हणून त्यांच्यापेक्षा मी थोडा सुखी होतो. असे ते दिवस होते. पण कॉलेजमध्ये आल्यावर आम्ही कुणीच त्यामुळे आमच्या कामात दुर्लक्ष होवू देत नव्हतो. एक महिना आणखी मिळतोय तेव्हा आता प्रदर्शन नक्कीच करावयाचे ठरविले. विद्यार्थ्यांनाही राहण्याचे, पाण्याचे प्रश्न होतेच. पण ते देखील एकदा वर्गात आल्यावर कामाला वाघ होते. त्यांचे कामात मन रमत होते. त्यांच्या विनंतीनुसार आम्ही त्यांना संस्थेत उशिरापर्यंत काम करू देत असू, कारण त्यांच्या खोल्यात दिवा-बत्तीचीही नीट व्यवस्था नव्हती. संस्थेचे वसतिगृह नव्हते. पण पुढे आम्ही शेजारच्या शासकीय कला-विज्ञान महाविद्यालयाच्या वसतिगृहात दरवर्षी ७-८ विद्यार्थ्यांची राहण्याची सोय करून घेतली. त्याकामी त्या संस्थेचे प्राचार्य नईमउद्दीन, प्रा.ग.म.पाटील व प्रा.पारनंदीवार ह्यांचे बहुमोल सहकार्य लाभले. विद्यार्थ्यांनी खूप मेहनत घेऊन खरोखरीच आमच्या अपेक्षेबाहेर उच्च दर्जाचे काम केले होते. १३ ऑगस्टला उद्घाटन. १० तारखेपासूनच आमची धावपळ सुरू झाली. त्या समारंभासाठी पुन्हा तात्या महाजनी वगैरे मंडळी औरंगाबादेत दाखल झाली. कला संचालक ११ किंवा १२ ला येणार होते. तात्या महाजनी देखील वास्तूचा कायापालट पाहून थक्क झाले. कला-संचालक आले. त्यांना जेव्हा प्रदर्शन करणार आहोत म्हणून सांगितले तर ते नुसते हसले (त्यातून हे स्पष्ट जाणवत होते की एवढ्या थोड्या काळातील वर्ग कामांची संख्या ती काय असणार आणि त्याचा दर्जा तो काय असणार!) ते उतरले होते जवळच्या सुभेदारी विश्रामगृहात. त्यांनी प्रत्यक्ष संस्था अद्याप पाहिलीच नव्हती. ते संस्थेत आले. वास्तूचा कायापालट त्यांच्या अपेक्षेपेक्षा खूपच चांगला झालेला पाहून खूप खूष झाले. पण

जेव्हा प्रदर्शन पहा म्हणून दुसऱ्या खोलीत नेले तर त्यांचा विश्वास बसेना. मग एकेक काम न्याहाळून पाहता त्या त्या विद्यार्थ्यांशी ते जेव्हा प्रत्यक्ष बोलले तेव्हाच त्यांचा विश्वास बसला आणि आम्ही जिंकले. आमच्याकडून अपेक्षेबाहेर काही तरी घडले होते. ह्या सर्वांचा आमच्या पुढील पाच वर्षातील घडामोडीवर बराच परिणाम झाला. आम्हाला आता कुठल्याच प्रकारे अडचणींना तोंड देणे जड जाणार नव्हते.

१३ ऑगस्टला उद्घाटन दिवस उजाडला. दुपारी ३ वाजता घाटी हॉस्पिटलमध्ये एक समारंभ मा.मुख्यमंत्री श्री.वसंतराव नाईक यांच्या उपस्थितीत होणार होता व नंतर ४ वाजता संस्थेचे उद्घाटन त्यांच्या हस्ते होणार होते. अजूनही शहरात पावसाचा थेंब पडलेला नव्हता. रोज सारखे दोन अडीचच्या सुमारास ढग जमले. रोजच्या सारखा उकाडा होताच. मनातून पाऊस हवा असे वाटत असले तरी आपला कार्यक्रम झाल्यावरच तो पडावा असे वाटत होते. नेमके साडेतीन वाजेच्या सुमारास ढगांचा गडगडाट विजेचा कडकडाट सुरू झाला. असे अंधारून आले होते की जणू संध्याकाळच झालीय आणि एकाएकी वादळी पावसास सुरुवात झाली. वारा मी म्हणत होता. सुरक्षा व्यवस्थेवरील पोलिस त्यांचे उच्चस्तरीय अधिकारी, त्यांच्या जिप्स गाड्या समोर उभ्या व पावसामुळे आडोशासाठी त्या लहानशा वऱ्हांड्यात एकच गर्दी झाली. मुख्य कार्यक्रम शेजारच्या महाविद्यालयाचे सभागृहात होता. सर्व निमंत्रित मंडळी तिथे जमलेली. मुख्यमंत्री प्रथम संस्थेत अधिष्ठाता कक्षाच्या दाराला लावलेली फीत कापणार, मग दीप प्रज्वलीत करून प्रदर्शनाचे उद्घाटन करणार व त्यानंतर सभागृहात भाषणे वगैरे असा कार्यक्रम होता. पावसाचे थैमान चालूच होते. ४-३० वाजले तरी मुख्यमंत्र्यंचा पत्ता नाही. वायरलेसवरून निरोप आला, अजूनही घाटी हॉस्पिटलमधला कार्यक्रम चालू आहे. ५ वाजले, पुन्हा संदेश आला. कार्यक्रम संपलाय पण पावसाचा जोर थोडा ओसरेपर्यंत निघता येत नाही. शेवटी ६ चे सुमारास पावसाचा जोर थोडा कमी झाला. इकडे बातमी आली हा पहिलाच पाऊस पडला म्हणून पेढे वाटण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांना १०० रु. दिलेत आणि ते इकडे येण्यासाठी निघताहेत आणि थोड्याच अवधीत ते येवून पोहोचले. फीत कापली, प्रदर्शन पाह्यले व सभागृहाकडे जाण्यास सर्वजण निघाले. सभागृहात सर्वजण इतका वेळ तिष्ठत आतुरतेने वाट पाहात होते अन्----- खास मुख्यमंत्र्यांच्या आगमनासाठी जो रस्ता तयार केला होता त्यातील एका भागात मुख्यमंत्र्यांच्या गाडीची चाके चिखलात फसली! पाऊस पडतच होता. मग दुसऱ्या गाडीतून त्यांना सभागृहाकडे न्यावे लागले. त्यात थोडा वेळ गेलाच. तेव्हाचे मराठवाड्यातील मंत्रीमहोदय सर्वश्री मा.शंकरराव चव्हाण, मा.कल्याणराव पाटील, मा.रफिक झकेरिया व तेव्हाचे शिक्षणमंत्री मा. मधुकरराव चौधरी यांच्या उपस्थितीत मुख्य कार्यक्रम संपला तेव्हा रात्रीचे आठ-सव्वा आठ वाजले होते. अशा प्रकारे नैसर्गिक जलधारांच्या- शुद्धोदकाच्या अभिषेकाने ह्या संस्थेची सुरुवात झाली. सर्वचजण त्यावेळी ह्या विलंबित पावसाच्या आगमनाने आनंदित झाले होते. सर्वजण शुभेच्छाचा व कौतुकाचा वर्षाव करीत होते. मलाही खूप आनंद झाला होता. गहिवरून आले होते. कला संचालकांनी पाठ थोपटली. माझ्याशिवाय इतर कुणालाही ठाऊक नव्हते, पण माधवराव सातवळेकर माझ्याजवळ एकदा ओघाओघाने बोलले होते. 'उद्घाटनाचा दिवस अन् माझा जन्म दिवस एकच आहे.' मी त्यांना हळूच म्हटले, "हॅपी रिटर्नस ऑफ द डे, कसं वाटतंय बर्थ डे प्रेझेंट ?" त्यांच्याच वाढदिवशी ह्या संस्थेची मुहूर्त मेठ व्हावी व त्यांच्याच कारकीर्दीत ही संस्था पूर्णत्वास पोहोचावी हा देखील योगायोगच. पाच वर्षानी पुढे त्यांची कारकीर्द संपली तेव्हाच संस्थेची पूर्णावस्था व माझीही संस्था प्रमुख म्हणून कारकीर्द संपली आणि आम्ही गेलो आमच्या गावा (नागपूरला). त्यानंतर फक्त एकदाच ह्या संस्थेत येण्याचा योग आला तो म्हणजे विद्यापीठाशी संलग्न होत असताना. विद्यापीठाने नेमलेल्या इन्सपेक्शन पॅनलचा एक सदस्य म्हणून. सध्याचे रूप पाहण्याचा योग मात्र अद्याप यायचा आहे.

पुढील पाच वर्ष संस्थेच्या विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची होती. जे काय करावयाचे ते पहिल्या पाच वर्षात. त्यानंतर संस्था पूर्णावस्थेला पोहोचली या सदरात जास्तीच्या मागण्या मंजूर होणे कठीण. म्हणून मी व समुद्र आम्ही दरवर्षी कला संचालनाकडे बजेट प्रपोझल पाठवीत असू, त्याची संचालनालयात छाननी होत असे व त्यांना योग्य वाटत असत त्या गोष्टीचाच उल्लेख करून कला संचालनालय शासनाकडे चारीही संस्थांच्या गरजांची मागणी आपल्या अंदाजपत्रकाच्या आराखड्यात नमूद करून मंजुरीसाठी शासनाकडे पाठवीत असे. आम्ही संस्थेच्या दुरुस्तीसाठी, फेरबदलासाठी, इलेक्ट्रिकल फिटींग्जसाठी, कला साहित्य, फोटोग्राफी, प्रिंटींगसाठी लागणारी यंत्रे व सामुग्री, त्यासाठी लागणारा खर्च, फर्निचरसाठी लागणारा खर्च तसेच नवीन पदांची (शिक्षक कर्मचारी) निर्मितीसाठी येणाऱ्या खर्चासाठी मागणी त्या त्या वर्षाची गरज पाहून करीत असू. अगदी दुसऱ्या वर्षीच आम्ही संस्थेसाठी संस्था प्रमुखपदी "अधिष्ठातांची" मागणी आमच्या मागणीपत्रात केली. इतर सर्व गोष्टी मान्य करून" अधिष्ठाता पदाची मागणी मात्र डावलण्यात आली. प्रभारी अधिकारी पदच पदरी पडले.

संस्था पूर्णावस्थेस पोहोचली नाही. कशाला "अधिष्ठाता पद" हवे? अशा प्रकारे ती मागणी धुडकावण्यात आली होती. मी कला संचालकांशी पुढे ह्याबाबत चर्चा करून कुठल्याही संस्थेच्या संस्था प्रमुखापेक्षा हे काम जास्त तर आहेच पण जोखमीचे आहे असे त्यांच्या गळी उतरविले. तिसऱ्या वर्षी आम्ही पुन्हा "अधिष्ठाता" पदाची मागणी करताना "प्राचार्यपद" मागावे ते कदाचित मिळून जाईल, असे श्री. समुद्र म्हणाले. पण मी त्यांचे न मानता पुन्हा "अधिष्ठाता" पद मागितले. अधिष्ठाता पदाचा उल्लेख करण्याऐवजी "प्राचार्य" पदाचा उल्लेख करून कला संचालनालयाकडून बजेट प्रपोझल शासनाकडे गेले व त्याला मंजुरीही मिळाली. श्री. समुद्र म्हणाले, "बघा मी म्हणत होतो तसेच झाले." पण मी त्यांना सांगितले, 'मी आता अधिष्ठाता पदासाठी झगडणार.' संधी मिळताच तत्कालीन शिक्षण सचिव औरंगाबादला काही कामानिमित्त आले असताना मी त्यांना भेटण्याची परवानगी मागितली. "जे.जे.स्कूल व इन्स्टिट्यूट या दोन्हीचे संस्थाप्रमुख व कला संचालनालय एकाच आवारात आहे. त्यामुळे या दोन्ही संस्था प्रमुखांना प्रोटेक्ट केल्या जाते व इतरांकडे दुर्लक्ष केले जाते असे माझे स्पष्ट मत मी त्यांच्याकडे व्यक्त केले. त्यांनी रीतसर निवेदन द्या, असे सूचित केले. मी त्याप्रमाणे केले, पण माझे निवेदन पुढे पोहोचण्यापूर्वीच त्यांनी पुढाकार घेऊन या प्रकरणाची चौकशी सुरू केली. पुढे वर्षभरातच संस्था पूर्णावस्थेत पोहोचली आणि औरंगाबाद व नागपूरच्या प्राचार्यपदाचे अधिष्ठाता पदात रूपांतर झाले. सेवाज्येष्ठतेच्या जोरावर माझे पूर्वपदावर (प्राध्यापक) प्रस्थान व मुंबईच्या प्राध्यापकाचे अधिष्ठाता पदावर औरंगाबादेत आगमन झाले, पण झगडून अधिष्ठातापद मिळविलेच याचे मात्र समाधान वाटले.

दरवर्षी नवीन विद्यार्थी येत होते. त्यांच्या संख्येत वाढ होत होती. दरवर्षी नव-नवीन शिक्षक बदलीद्वारे, बढतीद्वारे अथवा नियुक्तीद्वारे येत होते. पहिल्या वर्षी शिस्तीच्या बाबतीत आम्ही तिघांनी विद्यार्थी वर्गात व अध्यापकांत, तर श्री.समुद्र यांनी कार्यालयातील कर्मचाऱ्यांत एक पायंडा घातला. कार्यालयात कार्यालयीन वेळेवर येणे. वेळेवर मस्टरमध्ये सही करणे, केलेल्या कामाची रोज नोंद करणे, सर्वात मुख्य म्हणजे कामाच्या वेळेस, कार्यालयात, व्हरांड्यात अथवा वर्गात धूम्रपान अथवा पान तंबाखू खाणे वर्ज्य. मधल्या सुटीत कॉमन रूममध्ये ते करावयास हरकत नव्हती. नागपूरला, मुंबईला विद्यार्थी-शिक्षक यांच्यात सिगारेट, पान, तंबाखू यांची देवाणघेवाण

व मुंबईला शिक्षकांचा तंबाखू तर चपराशी अथवा विद्यार्थ्यांचा चुना हा प्रकार मी पाहिला होता. त्यामुळे एकमेकात निर्माण होणारा अनादर बघवत नव्हता. तसे इथे होऊ द्यावयाचे नाही, म्हणून प्रत्येक शिक्षक किंवा कर्मचारी इथे कामावर रुजू होत असे तेव्हा त्याला आम्ही ह्या शिस्तपालनाची जाणीव करून देत असू. मी काय किंवा इतर शिक्षक काय आम्ही कार्यालयीन वेळेनंतर व सुट्टीच्या दिवशी दिलखुलास गप्पागोष्टी, विनोद, विविध विषयांवर चर्चा करीत असू. कौटुंबिक तसेच संस्थेतील समस्या समजावून घेणे, एकमेकांना मदत करणे हे प्रकार दृष्ट लागावेत अशा प्रकारे घडत. सुट्टीच्या दिवशी कुणाकडे तरी जमून सामूहिक रेखाटन करणे अथवा कुठल्या तरी विषयावर एखाद्याच्या फिरक्या घेणे वगैरे प्रकार घडत. माझी पत्नी तेथे आल्यावर (घर मिळाल्यावर) आम्ही दोघंही सर्वांकडे अधूनमधून जात असू. आळीपाळीने एकेकाला आमच्या घरी बोलावीत. असे वातावरण असल्यामुळे संस्थेत चाकोरीबद्ध शिस्तीत राहाणे तर बाहेर अत्यंत मनमोकळेपणाने राहाणे हे खरोखरीच आमचे सर्वांचे वैशिष्ट्य होते. अशा वातावरणाचा संस्थेच्या प्रगतीवर खूप चांगला परिणाम होतो. काही शिक्षकही अशाच प्रकारे विद्यार्थ्यांशी वागत. वर्गात कडक पण बाहेर मृदू त्यामुळे विद्यार्थ्यांमध्येही एक शिस्तबद्ध राहणी, शिक्षकांबद्दल आदर असे. प्रत्येकाला प्रत्येकाबद्दल आत्मियता देखील वाटत होती. फक्त एकदाच असा प्रसंग घडला की, कला संचालक व श्री. पळशीकर औरंगाबादला आले असताना काही शिक्षकांनी आपल्या अडचणी, आपले विचार कला संचालकांकडे व्यक्त करण्याची इच्छा प्रदर्शित केली. तेव्हा मी त्यांना म्हटले की, मी व पळशीकर आम्ही बाहेर चक्कर मारून येतो व आपण त्यांच्याशी बोला. एखाद्या वेळेस माझ्या उपस्थितीमुळे आपल्याला त्यांच्याशी मोकळे बोलता येणार नाही. माझी खात्री होती की, मुंबईच्या एक-दोन व्यक्तींना इथली शिस्त जरा जाचक वाटत असेल, त्याचा ते उल्लेख करतील. बहुतेकांची गाऱ्हाणी बदली झाल्यावर इथे निवासस्थाने मिळणे जड जाते, डबल एस्टॅब्लिशमेंटचा त्रास होतो, अशा प्रकारची होती. माझ्या अपेक्षेप्रमाणे घडले. विरंगुळा म्हणून सिगारेट ओढावयाचे तर शिस्त आड येते. कधी कधी उत्साह वाढावा अथवा स्फूर्तीसाठी धूम्रपान आवश्यक वाटते वगैरे वगैरे अशाही एकदोघांच्या तक्रारी होत्याच. जेव्हा आम्ही परत चेंबरमध्ये आलो व शिक्षक निघून गेले, तेव्हा कला संचालकांनी याचा (शिस्तीचा) उल्लेख केला व खरोखरीच इतके कडक वागण्याची आवश्यकता तुम्हाला वाटते का? असा प्रश्न केला. तेव्हा मी त्यांना म्हटले, "तुम्ही मुंबईला असता. तेथील संस्थेत जे काय चालते ते सर्व चांगले आहे असे तुम्हाला वाटते का? इथल्या वातावरणात तुम्हाला काय आढळते? मुंबईसारखे वातावरण इथे निर्माण झाले तर तुम्हाला ते आवडेल का? आपल्या कुटुंबात शिस्तीप्रमाणेच आपण कुटुंबातील प्रेम देतो, जिव्हाळा देतो व त्यामुळेच एक प्रकारचा आनंद व सुख निर्माण करतो ना? कुटुंबात देखील मिळत असलेल्या प्रेम व जिव्हाळ्यापेक्षा सर्वांना फक्त शिस्तीतील जाचकपणा तेवढा जाणवतो. ही संस्था एक कुटुंब आहे. ह्या जाणिवेतूनच इतर वेळी मी त्यांच्याशी कसा वागतो हे त्या व्यक्तींना विचारा." तेव्हा ते म्हणाले, "त्या सर्व गोष्टी त्यांनी सांगितल्या. त्यांनी ही तक्रार म्हणून केली नव्हती, असे काही खट्टे मिठ्ठे किस्से इथेही घडले, नाही असे नाही, पण सर्व गोष्टींचा सांगोपांग विचार करता इथे संस्थेच्या हिताच्याच गोष्टी जास्त घडल्या.

मात्र एक गोष्ट वाईट घडली व ती आता सुधारता येणेही अशक्य कोटीतील गोष्ट आहे, पण त्यामुळे संस्थेचे बरेच नुकसान झाले असे मला वाटते. ती म्हणजे संस्थेच्या २५-३० वर्षानंतरच्या विकासाच्या दृष्टीने विचाराने करावयाची जागेची तरतूद.

त्याप्रमाणे मीही तेव्हा हा विचार केला की, जनाना महाल ही वास्तू चांगल्या जागेवर असली व ती इमारत आज जरी पुरेशी वाटत असली तरी उद्या ती नक्कीच कमी पडणार. तिच्या वाढीसाठी संस्थेजवळ आजूबाजूला जागा नाही. हा विचार करता मला असे आढळून आले की, इंजिनिअरिंग कॉलेजजवळ ११० एकर जमीन उपलब्ध असून, त्यातील काही भागावर झोपडपट्टी आहे. तेव्हा त्या कॉलेजच्या प्राचार्यांना गाठून १०-१५ एकर जमीन आम्हाला द्या, अशी मागणी करावी म्हणून मी त्यांना भेटलो असता त्यांनी सांगितले, 'आमच्या योजना आखलेल्या असून आम्ही इंचभरही जागा देऊ शकत नाही.' मी त्यांना म्हटले, 'झोपडपट्टी जागा गिळंकृत करते ते चालते. दोन शिक्षणसंस्था जवळ आल्या तर किती तरी कार्यक्रम एकत्र करता येतील.' त्यांना ते पटले पण ते म्हणाले, 'हे सर्व वरच्या स्तरावरून घडले तर मी काही अडकाठी आणणार नाही; पण मी स्वतःहून तशी पावले टाकू शकणार नाही.' मी कला संचालकांशी चर्चा केली. त्यांनी सचिव शिक्षण विभाग, तंत्र शिक्षण संचालक विभाग, मंत्री यांच्याशी संपर्क साधला व आम्ही १० एकर जागा मिळविली. साईट फॉर स्कूल ऑफ आर्टचा बोर्ड लावला. १० एकर जागेला तारेचे कुंपण केले. मुंबईहून जागा पाहण्यासाठी कला संचालक व आर्टिटेक्टनी जागेचे आहे ते स्वरूप (उंच सखल) कायम ठेवून स्कूल ऑफ आर्ट कँपस कसा विकसित करता येईल वगैरे सांगितले. पण या सर्वांवर एकाएकी पाणी पडले. इंदिरा गांधींच्या २० कलमी कार्यक्रमांतर्गत झोपडपट्ट्यांच्या पुनर्वसनासाठी औरंगाबादमधील मध्यवस्तीतील झोपड्या हलविण्यासाठी, तत्कालीन कमिशनरांनी ती जागा निवडली व तिथे पाण्यासाठी व नळ व सार्वजनिक शौचकुपांची प्रथम व्यवस्था केली गेली. अशा तऱ्हेने माझ्याच कारकीर्दीत संस्थेला मोठी जागा मिळवून देण्याचे माझे स्वप्न प्रत्यक्षात येतायेता विरले, ही एक खंत कायमची राहिलीय. संस्थेच्या विकास काळात पुढे म्हणण्यासारख्या अडचणी जरी आल्या नाहीत तरी मनस्ताप होण्यासारख्या घटना घडत होत्या. पण निग्रहाने त्याचा विपरित परिणाम मी माझ्या कामावर होऊ दिला नाही की, त्याचा बाऊही केला नाही.

दरम्यान ज्या प्राध्यापक पदावर मी काम करीत होतो ती जागा लोकसेवा आयोगामार्फत भरावयाची असा घाट शासनाने घातला. त्यामुळे संस्थेच्या कामाव्यतिरिक्त त्या इंटरव्ह्यूसाठी तयारी करणे, राज्य कला प्रदर्शनासाठी चित्रे तयार करणे प्राप्त होते, आणि त्यात कहर म्हणजे नेमके त्या इंटरव्ह्यूच्या १५ दिवस आधीच अकोल्याला वडिलांचे निधन झाले. मी, माझी पत्नी आणि धाकटा मुलगाच इथे होतो. मुलगी अनुक्रमे नागपूरला व मुलगा मुंबईला शिकत होता. त्यातच पत्नीच्या प्रकृतीत बिघाड झाला. घाटी हॉस्पिटलमध्ये दाखल केल्यामुळे संस्थेतील काम, घरातील व्यवस्था व हॉस्पिटलच्या वाऱ्या चालूच असत. पण या वैयक्तिक अडचणींचा मी कधीच बाऊ केला नाही की, वरिष्ठांकडे उल्लेखही केला नाही. पण या गोष्टी लपत नव्हत्या व कानावर पडत होत्याच. त्यामुळे माझ्या कामातील सचोटीबद्दल आता सर्वत्र एकवाक्यता झाली होती. काही सुखद घटनाही त्यावेळी घडत गेल्या, त्यामुळे एक धागा सुखाचा अने अनेक धागे दुःखाचे हा अनुभवही प्रत्ययास आला. याच काळात धाकटा मुलगा चांगल्या प्रकारे शेजारच्या आर्ट अँड सायन्स कॉलेजमधून बी.एस्सी. पास झाला. तिकडे मुलगी बी.ए.पास होऊन विद्यापीठातून एम.ए. देखील झाली. मोठा मुलगा प्रिंटिंग डिप्लोमा घेऊन मुंबईत मार्गाला लागला आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे इथल्याच वास्तव्यात मुलीचे लग्नही झाले. औरंगाबादचे वास्तव्य मी कधीच विसरू शकणार नाही असेच होते. खऱ्या अर्थाने ती मी 'माझी 'कर्मभूमी' मानतो. अडचणी जरी होत्या तरी येथील शिक्षक एकत्र कुटुंबपद्धतीप्रमाणे जीवन जगत होते. इथे इतर संस्थांप्रमाणे आपण ज्येष्ठ व दुसरा कनिष्ठ हा भेदभाव फक्त वेतनश्रेणीपुरताच होता. आम्ही सर्वजण मित्रत्वाच्या भावनेतूनच काम करीत होतो. प्रथम मित्र व मग अधिष्ठाता, प्राध्यापक, अधिव्याख्याता, सहअधिव्याख्याता किंवा कार्यालयातील कर्मचारी असे ते नाते होते. दरवर्षी शिक्षकवर्गात व कार्यालयीन कर्मचाऱ्यात वाढ होत

होती. काहीजण सरळ नियुक्तीद्वारे आले, तर काहींची बदली झाल्यामुळे. बदलून आलेले बहुतेक विमनस्क परिस्थितीत यावयाचे, त्याला कारणेही असत. कुणाच्या विशिष्ट प्रकारच्या जबाबदाऱ्या, कुणाच्या सहचारिणी मुंबईत अथवा नागपुरला नोकरीत व्यस्त म्हणजे दोन एस्टॅब्लीशमेंटस् अटळ आणि आणखी एक प्रकार जाणून बुजून घडत होता. नागपूर व मुंबईच्या संस्था प्रमुखांना जी व्यक्ती नको असे अथवा तापदायक वाटत असेल अशा व्यक्ती किंवा ज्यांना कुणीच वाली नाही- परिस्थितीमुळे राजकारण किंवा छक्केपंजे करता येत नाहीत अशा व्यक्तींची औरंगाबादला उचलबांगडी करणे. अशा व्यक्तींबद्दल मला एक वेगळ्याच प्रकारची सहानुभूती वाटत असे. मी वेळ पाहून त्याबाबत त्या व्यक्तीला 'झाल्या प्रकरणी मला जाणीव आहे. तिथे तुम्ही नको असलात तरी इथे गरज आहे. तिथे हेव्यादाव्यापायी तुमच्या कर्तृत्वाला वाव मिळाला नाही, इथे मिळेल. वरिष्ठांना तुमचे मेरिट दाखवण्याची हीच वेळ आहे. तुम्ही कर्तव्यदक्ष रहा, सर्व काही ठीक होईल' मी माझ्या नियुक्तीची हकीकत त्यांना सांगून 'मी इथे आलो म्हणून मला माझे कर्तव्य दाखविता आले. मी माझे व्यक्तिमत्व घडवत आहे. मलाही कशा अडचणी आहेत' असे सांगून त्यांना निरुत्साही न होता जोमाने काम करावे, हेही दिवस निघून जातील वगैरे सांगून धीर देत असे. या गोष्टीमुळे बहुतेक सर्वांना माझ्याबद्दल एक प्रकारची आपुलकी वाटत असे. कुणाशीही मर्यादित अंतर सोडून स्वार्थासाठी जवळीक केली नाही. या अंतराची सर्वांनाच जाणीव होती व त्यामुळेच आम्हा सर्वात एकमेकांविषयी आदरयुक्त अशी जवळीक निर्माण झाली होती. त्यामुळेच मला तिथे आलेल्या बहुतेक सर्व व्यक्तींकडून भरपूर सहकार्य मिळाले व संस्थेचा अल्पावधीत उत्कर्ष झाला. संस्थेला लोकाभिमुख करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी वेगवेगळी कला प्रदर्शनं दरवर्षी भरविणे, त्याचवेळी जागेवर (ऑन द स्पॉट) व्यक्ती रेखाटने करून त्याचा मोबदला म्हणून पैसे घेऊन, प्रदर्शनाला प्रवेश शुल्क (नाममात्र) घेऊन निधी जमा करणे, प्रदर्शनातील चित्रे विकल्या गेल्यास २० टक्के रक्कम मुख्यमंत्री टंचाईग्रस्त पीडित निधीस किंवा पूरग्रस्तांच्या पुनर्वसन निधीस देणे हेदेखील नित्याचे होते. मी स्वतः देखील माझ्या चित्रांचा वन मॅन शो करून मिळालेली रक्कम अशा निधींना देऊन स्वतः केले मग सांगितले असा प्रकार करीत असे. आम्ही काही शिक्षकांनी संस्थेचे नाव इतरत्र व्हावे म्हणून नगरला देखील एक ग्रुप शो केला. विद्यार्थ्यांना अर्थार्जनाचा एक मार्ग म्हणून कॉलेजच्या वेळेव्यतिरिक्त इतर वेळात संस्थेत सहकारी तत्त्वावर एक प्रयोग केला. शिक्षक व विद्यार्थी यांनी मिळून (विद्यार्थी प्रत्येकी ५ रु. तर शिक्षक प्रत्येकी १० रु. असे जमा करून) एक निधी जमा केला व त्यातून साहित्य खरेदी करून कलात्मक आकाशकंदिल तयार केले. त्यांचे प्रदर्शन व विक्रीद्वारे जो निधी जमा होईल त्यातील भांडवल रक्कम प्रत्येकाची प्रत्येकाला परत केल्यावर जो नफा होईल त्यातील ५० टक्के रक्कम सर्वात सारखी वाटून उरलेली पूरग्रस्तांच्या निधीला द्यावयाचे ठरविले. अट हीच की, जो भांडवल उभारण्यात प्रत्यक्ष हातभार लावेल त्याने स्वतः आकाशकंदिल करण्यास हातभार लावला पाहिजे. निष्क्रीय भांडवलदार नको होते. त्यानुसार ५-७ शिक्षक व २५-३० विद्यार्थ्यांनी बाजारात इतरत्र कुठेही दिसणार नाही असे थर्माकोल, पोस्टर पेपर व विविध प्रकारचे साहित्य वापरून जवळजवळ २२५-२५० आकाशकंदिलांची दीपजत्रा बलवंत मोफत वाचनालयाच्या (त्यावेळी नुकत्याच बांधलेल्या) हॉलमध्ये भरविली. असा प्रकार तोपर्यंत कुठल्या संस्थेत घडला नव्हता. अगदी ५ रु. पासून १०० रु. पर्यंत किमती ठेवल्या होत्या आणि आठ दिवस प्रवेश शुल्क ठेऊन प्रदर्शन उघडे ठेवले. सर्व कंदिल विकले गेले. भांडवल व ५० टक्के नफा वगळता आम्ही ६५० रु. पूरग्रस्तांच्या पुनर्वसनाला मदत म्हणून दिले. या कामी बलवंत वाचनालयाचे (रवि आर्टस्) चे फार सहकार्य लाभले. कारण त्यांनी हॉल विनाभाडे दिला होता. आमच्या प्रत्येक उपक्रमाला मग ते प्रदर्शन असो अथवा संस्थेतील इतर कार्यक्रम असोत, श्री.अनंतराव भालेराव व त्यांच्या सहकाऱ्यांनी मराठवाडा दैनिकाद्वारे भरपूर प्रसिद्धी देऊन खऱ्या अर्थाने लोकाभिमुख केले. संस्थेची समाजाशी बांधिलकी राहावी या उद्देशाने मी स्वतः 'ही प्रदर्शने कशासाठी' हा लेख मराठवाडा दैनिकाद्वारे प्रकाशित केला. औरंगाबादला रोटरी क्लब, महिला महाविद्यालय, शासकीय अधिकाऱ्यांची 'स्नेहनगर' वसाहत, इंजिनिअरिंग कॉलेज, चाळीसगांव तसेच लातूरच्या लायन्स क्लब व कला संस्थेत 'दैनंदिन जीवनात रंगाचे महत्त्व' या विषयावर प्रात्यक्षिकांसह भाषणे दिली. उद्देश हाच की, संस्था लोकाभिमुख व्हावी. ही भाषणे मी बहुतांशी पहिल्याच वर्षी दिली. त्यामागे विद्यार्थ्यांची आवक वाढावी हाही उद्देश होता व तो सफलही झाला. इतर शिक्षकही आपआपल्या परीने तसे प्रयोग करीत होते. जसे आकाशकंदिलांच्या दीपजत्रेची मूळ कल्पना व पुढाकार मुंबईहून आलेल्या प्राध्यापक कामतांची व सहभाग होता माझा, श्री.नंदा देशपांडे, श्री.निब्रे, श्री.बेळे, श्री.पेंडसे, श्री.विचारे वगैरेंचा व काही विद्यार्थ्यांचा. या व्यतिरिक्त श्री.बेळे यांनी देखील 'नवग्रह' म्हणून नऊ विद्यार्थ्यांच्या सहकारी तत्त्वावर आधारित एका ग्रुपला 'औरंगाबाद दर्शन' म्हणून औरंगाबादमधील काही जागांची निवड करून दिवसा उजेडी व रात्रीचे त्यांचे स्वरूप दाखविणाऱ्या १५० निसर्गचित्रांची निर्मिती करून वसंत भवन मध्ये प्रदर्शन व विक्री करण्यास मार्गदर्शन करून मिळालेल्या उत्पन्नातून पुन्हा कला साहित्य खरेदी करून दुसऱ्या वर्षी व्यक्तिचित्र व दिवाळी शुभेच्छा पत्रिकांचे प्रदर्शन व विक्री घडवून आणण्यात हातभार लावला.

या सर्व गोष्टी एकहाती होत नसतात. त्याला प्रसिद्धी द्यावी लागते, त्यावर लेख लिहावे लागतात. अशा कामात श्री. अनंत बोवलेकर, श्री. भोईर, प्रा. पेंढारकर ही संस्थेतील माणसं, तशीच संस्थेबाहेरील श्री. महावीर जोंधळे, श्री. निळू [redacted], श्री. गवळी, प्रा. फ.मु. शिंदे, प्रा. सौ. सुनेत्रा ओक यांचे सहकार्य व सहभाग होता म्हणून हे सर्व घडले. यापैकी कुणीही मला किंवा मी त्यांना पूर्वपरिचित नव्हतो. संस्था निर्मितीच्या निमित्ताने इथे आल्यावर सर्वांचे परिचय घडवून आणावे लागले होते आणि ५ व्या वर्षी तर लोकांनीच समीकरण मांडले, किले अर्क- शासकीय कला महाविद्यालय (स्कूल ऑफ आर्ट) - रंग रेखा = नाविन्यपूर्ण कला निर्मिती. जो कोणी भेटावयाचा तो विचारावयचा "रंग-रेखा" यंदा काय दाखविणार? माझे उत्तर असावयाचे, "बघू या, पण निश्चित काही तरी घडेल." आणि घडत गेलं. असाच एक ३ आठवड्याचा उपक्रम आम्ही गव्ह. पॉलिटेक्निक कॉलेजमधील (गव्ह. स्कूल ऑफ आर्ट सोडून) विद्यार्थ्यांसाठी केला. कॅमेरा म्हणजे काय इथपासून ते एका पूर्ण मोठ्या आकाराच्या फोटोच्या निर्मिती व प्रेझेंटेशन पर्यंत अभ्यासक्रम आखून फोटोग्राफीचा छंद वर्ग इंजिनिअरिंग कॉलेमध्ये आयोजित केला होता. त्यासाठी लागणारे साहित्य, डार्क रूमस् इंजिनिअरिंग कॉलजचे, कॅमेरा प्रत्येकाला स्वतःचा, शिक्षणक्रम तयार करणे व शिकविण्याची जबाबदारी या संस्थेतील त्यावेळचे फोटोग्राफी विभागाचे प्रभारी अधिकारी व अधिव्याख्याता, श्री. बिसने, इंजि. कॉलेजमधील जिऑलाजी विभागाचे प्रा. एम.जी. देशपांडे, प्रा. बाबुराव कुलकर्णी व माझ्या स्वतःवर होती. आज त्यातील कित्येक विद्यार्थी व्यावसायिक स्वरुपाची कामे करताहेत. अशी आमची त्यावेळी नुसती "वाटचाल" नव्हती तर "घोडदौड" चालू होती.

संस्थेच्या स्थापनेनंतर अवघ्या तीनच वर्षानी विद्यार्थ्यांनी राज्य पातळीवरील कला प्रदर्शनात नेत्रदीपक कामगिरी करून दाखविली. त्या वर्षी शिक्षकांनीही बरीच बक्षिसे व्यावसायिक विभागात मिळविली. विद्यार्थ्यांच्या प्रदर्शनात रेखा रंगकला विभागातील पहिले व चौथे बक्षिस या संस्थेस आले. विद्यार्थ्यांना मुंबईहून आलेल्या प्रा. देवांचे मार्गदर्शन फार बहूमोलाचे ठरले. त्या वर्षी कला शिक्षक प्रशिक्षण वर्गाने व उपयोजित कला विभागाने देखील उल्लेखनीय प्रगती दाखविली. या सर्वांचा उल्लेख

प्रदर्शनाच्या निवड व परीक्षक समितीच्या एक सदस्या व प्रसिद्ध चित्रकर्त्या सौ. डहाणुकर यांनी संस्थेच्या वार्षिक कला प्रदर्शन उद्घाटन प्रसंगी केला. त्यावेळी त्यांना प्रमुख पाहुण्या म्हणून बोलविले होते.

प्रथम उल्लेख केल्याप्रमाणे मी जी परिचय मोहीम सुरू केली होती, त्यात मला पुढील व्यक्ती भेटल्या व त्यांचे सहकार्य वेळोवेळी लाभले म्हणूनच आम्ही काही तरी घडवू शकलो. त्या व्यक्ती म्हणजे सुप्रसिद्ध साहित्यिक व टीकाकार प्रा. वा. ल. कुलकर्णी, कै. प्रा. म.भि. चिटणीस, प्रा. भगवंतराव देशमुख, प्रा. ग.म. पाटील, प्रा. बाबासाहेब पारनीवार, कै. प्रा. गुप्ते, कै. श्री. ज.प. मुळे, प्रा. सुधीर रसाळ, प्रा. यू.म. पठाण, प्रा. ब्रम्हानंद देशपांडे, प्रा. मुळे, प्रा. डॉ. एस.डी. बाळ, डॉ. पुरवार, आर्टिस्ट हुसैनी, रवी पेंटर, मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. डॉ. नाथ, श्री. महाजन, कुलसचिव डॉ. ताम्हणकर, प्रा. वसंत कुंभोजकर, एन.सी.सी. लेफ्टनंट कर्नल साबळे, इंजिनिअरिंग कॉलेजचे प्राचार्य श्री. गणेश राव, प्रा. बाबुराव कुलकर्णी, प्रा. एम.जी. देशपांडे, गव्ह. पॉलिटेक्निकचे प्राचार्य पंडितराव देशपांडे, तत्कालीन पोलिस कमिशनर श्री. बी.के. गोवर्धन व श्री. व्ही. व्ही. चौबळ, जिल्हा परिषद अध्यक्ष श्री. पालोदकर, जि.प. सी.ई.ओ. सौ. राणी वर्मा, आमदार कै. श्री. वैशंपायन, श्री. गोविंदभाई श्रॉफ, श्री. अनंतराव भालेराव, श्री. महावीर जोंधळे, तेव्हाचे कलेक्टर श्री. भालचंद्र भागवत, "काडा"चे प्रमुख अधिकारी श्री. पै, इमारत व बांधकाम खात्याचे सु. इंजि. श्री. डावर, तत्कालीन हे. इंजिनिअर श्री. घोळसंगी, तसेच ओव्हरसीअर श्री. आठल्ये, टेलिफोन एक्सचेंजचे श्री. कुलकर्णी, सब डिव्हीजनचे सु. इंजि. श्री. देशमुख इ. या सर्व व्यक्तींचे व्यक्तिगत सहकार्य या ना त्या कारणाने मला वेळोवेळी लाभले, कुणाचे शासकीय स्तरावरील कामात तर कुणाचे संस्थेला लोकाभिमुख करण्यासाठी आयोजिलेल्या प्रत्यक्ष उपक्रमांत सहभाग घेऊन अथवा अन्य प्रकारे. या मंडळींनी मी स्वतःहून करून घेतलेल्या परिचयास नुसताच औपचारिकपणा न मानता प्रत्यक्षात स्नेह संवर्धन केले. त्याचाच दृश्य परिणाम म्हणजे या संस्थेने केलेली प्रगती पथावरील घौडदौड. औरंगाबादला आलो तेव्हा परिचयाअभावी एकटेपणा जाणवत होता, परत जाताना या सर्वांना सोडून जाण्यामुळे एकटेपण जाणवत होते.

संस्था प्रगतीपथावर नेण्यास जशी सामाजिक स्तरावरील वर निर्देशित व्यक्तींचा उल्लेख करणे अनिवार्य वाटते, तसेच संस्थेत एक प्रकारचे सर्जनशील वातावरण निर्माण करून, संस्थेला स्थैर्य आणून देण्यातच नव्हे तर शिस्त राखून व कार्यरत राहून जे धडाक्याने पुढे नेले त्या माझ्या तेव्हाच्या सहकाऱ्यांचा उल्लेख न करणे कृतघ्नपणाचे ठरेल. जसजशी संस्था वाढू लागली तसतशी ही मंडळी औरंगाबादेत दाखल झाली व त्यांनी मला नुसतेच सहकार्य दिले नाही, तर जो कौटुंबिक स्नेह व जिव्हाळा दिला त्यामुळे व त्यांच्या सहकार्यामुळेच मी, त्याकाळी आदर्श ठरावी अशी ही संस्था घडवू शकलो. ही मंडळी म्हणजे माझ्या बरोबर औरंगाबादेत दाखल झालेले सध्याचे तेथील रेखा व रंगकला विभाग प्रमुख प्रा. लवाटे, प्रा. अनंत बोवलेकर व मग एका नंतर एक दाखल होत गेलेले नाशिकचे प्राध्यापक पंडित सोनवणी, श्री. बिजमवार, श्री. वडंगेकर, प्रा. भोईर, श्री. काटे, सध्या नागपुरला असलेले श्री. बेळे, श्री. बिसने, सध्या नाशिकला असलेले अविनाश पळणिटकर, मुंबईहून आलेले सर्वश्री दीक्षित, एन.डी. देशपांडे, व्ही.एस. निंब्रे, एन.डी. विचारे, प्रा. कामत, श्री.पेंडसे, सध्या गोव्याला असलेले प्रा. ए.एस. देव, नागपूरचे श्री. चंद्रकांत पांडे व प्रा. पेंढारकर, श्री. बेलेकर, वामन चिंचोळकर ही मंडळी वेगवेगळ्या ठिकाणाहून औरंगाबादेत आली व सगळे आपापले वेगळेपण विसरून इथे एकदिलाने झटली म्हणूनच सर्व काही घडू शकले. पण हे सर्व काही घडत असताना काही जण पडद्याआड झटत असतात. सजवलेला रंगमंच सर्वांना दिसत असला तरी वेषभूषा, रंगभूषा रंगमंच सजविणारे दिसत नसतात, पण त्यांचे कार्य दिसते. अशा पडद्यामागील व्यक्तींचे कर्तृत्व व महात्म्य, डावलतो म्हटले तरी डावलता येत नाही, असे ते रंगमंच व्यवस्थापक श्री. समुद्र व त्यांचा संच (सर्वश्री पापळकर, भालेराव, थोरात, व्यवहारे, दहिवाल, तेलतुबडे दोन्ही जाधव, रुद्रे, बागडे, रामचंद्र सोनवणे इ.) ही सर्व मंडळी आपआपल्या स्तरावरील सर्व कामे अत्यंत प्रामाणिकपणे, निष्ठेने, जीव तोडून शिस्तीत करीत होती, म्हणून हे पाच अंकी नाटक शेवटचा पडदा पडेपर्यंत रंगतच गेले. शेवटी एवढेच सांगू इच्छितो की....

कुठलीही संस्था एका व्यक्तिची एकट्याची नसते. विविध प्रकारच्या व विचारांच्या अनेक व्यक्तिंची असते. हे जरी खरे असले तरी जो संस्थाप्रमुख असतो त्याची एक वेगळी आगळी जबाबदारी असते. चांगल्या गोष्टी घडल्या, संस्था आपल्या कार्यात यशस्वी झाली तर त्या यशाचा मुकुटमणी त्याच्या शिरावर विराजमान होतो व सर्वजण त्याचे श्रेय त्याला एकट्यालाच देतात. काही विपरीत घडले तर त्याचे खापरही त्याच्याच माथ्यावर फोडले जाते व सर्व दोष त्याच्याच माथी चिकटतो. पण खरी वस्तुस्थिती वेगळीच असते. संस्थेची वाटचाल फक्त एकट्या संस्थाप्रमुखावर अवलंबून नसते, तर चमूच्या सहकार्यावर! चमूचा सहकार म्हणजे यश, तेव्हा पहिल्या पाच वर्षातील त्या यशस्वी वाटचालीचे श्रेय त्याकाळी पुष्कळांनी जरी मला दिले तर मी तसे मानले नाही व आजही मानत नाही. त्या वेळच्या यशाचे सर्व श्रेय वर निर्देशित नामावलीतील सर्व व्यक्तिंना द्यावयास हवे. योग होता म्हणून मार्गदर्शकाचे व सर्वांना एकत्र ठेवून काम करण्याची जबाबदारी माझी होती. प्रसंगी अधिकारवाणी वापरावी लागली. शिस्तपालन करवून घ्यावे लागले, हे जरी खरे असले तरी एकमेकांत जवळीक व जिव्हाळा निर्माण करून संस्थेत निदान पहिले पाच वर्ष तरी कौटुंबिक वातावरण निर्माण करून संस्था अथक कार्यरत ठेवण्याचे प्रयत्न केले, म्हणूनच एकमेकांत स्नेहभाव व सहकार निर्माण झाला व यशप्राप्ती पदरी पडली. सर्व श्रेय सर्वांनी दिलेल्या सहकारातच सामावले होते. त्याकाळी अनवधानाने काही गोष्टी करावयाच्या राहिल्या असतीलही किंवा अशा काही चुकाही झाल्या असतील. असे काही घडलेच असेल तर ते निव्वळ त्यावेळच्या माझ्या मार्गदर्शनाच्या अनुभवा अभावीच घडले असावे, हेही येथे प्रांजळपणे नमूद करू इच्छितो.

औरंगाबाद म्हटले की, एकट्या मलाच नव्हे तर माझ्या कुटुंबातील सर्वांनाच या संस्थेतील त्या वेळच्या प्रत्येक व्यक्तिंची, त्यांच्या वैशिष्ट्यांची आठवण येते. अगदी बागडे, रामचंद्र जाधवमामा, सोनवणे मामापासून तो श्री. समुद्र यांच्यापर्यंत, कार्यालयातील सर्व कर्मचाऱ्यांची सर्व शिक्षक वर्गाची मुले देखील. आमच्यापैकी कुणीही औरंगाबादचे वास्तव्य कधीच विसरू शकणार नाही, ही अतिशयोक्ती म्हणता येणार नाही. जीवनातील सरसकट सर्व प्रकारच्या अनुभवांचा साक्षात्कार आम्हा सर्वांनाच तिथे घडला. तोही या संस्थेमुळेच ना? अन्यथा औरंगाबादला जाऊन रहाण्याचे दुसरे प्रयोजन काय होते? या संस्थेच्या निर्मितीच्या निमित्ताने मी एक वेगळेच समाधान साठवले असून कित्येकांशी मैत्रीचे अतूट नाते जोडले आहे. सेवाकाळातील हीच माझी खरी व फार मोठी कमाई मी समजतो. कुणीही व्यक्ती आपले पद सोडून गेली तर संस्था तिथेच असते व तिची प्रगतीही होत असते. बदलतो फक्त काळ. त्याबरोबर कामाचे स्वरूप व निष्ठांची परिमाणे. या नियतकालिकाच्या निमित्ताने गत काळातून एक फेरफटका मारता येण्याची संधी मिळाली, याबद्दल आनंद वाटला. समाधान वाटलं.

संस्थेला या निमित्त सुयश चिंतून मी इथेच हे कथन थांबवितो.